




REGISTERED No. B. 3434

# अर्थ

' अर्थ एव प्रधानः ' इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति । —कौटिलीय अर्थशास्त्र

संस्थापक—प्रो. वा. गो. काळे ★ संपादक—श्री. वा. काळे

वर्ष १२ पुणें, बुधवार तारीख ३ एप्रिल १९४६ अंक १४



गेल्या वर्षांतील स्पृहणीय यश,

हाच नव्या वर्षाचे कार्याला सुमुहूर्त.

## दि सुप्रीम म्यूच्युअल अॅशुअरन्स कं. लि.

गेल्या वर्षांतील कामाचा आढावा

१. कंपनीकडे आलेले विमाअर्ज
रु. १८,८९,००० चे वर

२. कंपनीनें स्वीकारलेले विमाअर्ज
रु. १७,८०,००० चे वर

३. पूर्ण झालेलें काम
रु. १६,६९,००० चे वर

अल्पावधींत मिळविलेल्या यशाची वरील आंकडेच ग्वाही देतील.

—एजन्सीसाठीं व विम्यासाठीं चौकशी करा—

मॅनेजर,
दि सुप्रीम म्यु. अॅ. कं. लि.

हेड ऑफिसः—
८६६ सदाशिव पेठ, पुणें नं. २

## दि विजय टेक्स्टाइल्स लिमिटेड

—येरंडवणा, पुणें ४—

अधिकृत व विक्रीस काढलेलें भांडवल
रु. १,००,०००

भरणा झालेलें भांडवल
रु. ३४,५००

सदर भांडवल २५ रुपयांच्या २००० ऑर्डिनरी शेअर्समध्यें आणि ५० रुपयांच्या ६ टक्के दराच्या १००० प्रेफरन्स शेअर्समध्यें विभागण्यांत आलें आहे.

—मॅनेजिंग एजंटस—
महा—कवडीकर आणि कंपनी

सदर कारखान्यांत नित्योपयोगी सुती कापड तयार होतें

## —: साठे बिस्किटें :—

श्रूसबरी, ऑरेंज, फ्रॅन्सिस व फॅमिली मुंबई प्रांतांतील ग्राहकांस पूर्ववत् मिळूं लागलीं. परिस्थिति अनुकूल होतांच इतर प्रांतांतील ग्राहकांसही पाठवूं शकूं.

—साठे बिस्किट कं., पुणें २

तयार कपड्यांचे व्यापारी **महिंद्रकर ब्रदर्स** गिरगांव, मुंबई नं. ४ व बुधवार चौक, पुणें

## विविध माहिती

### कावेरीचें चित्रीकरण

डॉ. पथी ह्यांनी पूर्वी यमुना नदीचें चित्रीकरण केलें होतें. आतां त्यांनीं कावेरी नदीचें चित्रीकरण करून त्याची छोटी फिल्म तयार केली आहे, ती शैक्षणिक व भौगोलिक दृष्ट्या उद्बोधक होईल.

### " अमेरिकेवर विसंबूं नका "

हिंदी कारखानदारांस मदत करण्यास अमेरिकेस वेळहि नाहीं व सोईहि नाहींत, असें डॉ. हमीद, इंडियन केमिकल इंडस्ट्रीजच्या शिष्टमंडळाचे नेते, ह्यांनीं मुंबई येथें परत आल्यावर सांगितलें.

### म्हैसूर ग्लास अँड एनॅमल वर्क्स लि.

ओगले ग्लास वर्क्स लि. च्या मॅनेजिंग एजन्सीखालील वरील कंपनीनें गेल्या वर्षाकरितां १०% डिव्हिडंड जाहीर केलें आहे.

### स्त्रियांना काम करण्याची विनंति

उत्पादन वाढविण्याची आवश्यकता समजावून सांगतांना, ब्रिटिश मुख्य प्रधान, मि. ॲटली, ह्यांनीं स्त्रियांना कारखान्यांत आणि शेतांत काम करण्याची कळकळीची विनंति केली.

### हिंदी लष्करांतून मुक्त झालेले सैनिक

हिंदी लष्करांतून आतांपर्यंत ४,९५२ अधिकारी व २,९२,५६१ शिपाई मोकळे करण्यांत आले आहेत. ३१ मे १९४६ अखेर एकूण ८,५०,००० सैनिक मोकळे व्हावयाचे आहेत.

### हिंदुस्थानांत तयार करण्यांत आलेले मालाचे डबे

गतवर्षी हिंदुस्थानांत मालाचे ७,६३६ डबे तयार करण्यांत आले.

### अमेरिकेंत जर्मन शास्त्रज्ञ

सुमारें १६० जर्मन शास्त्रज्ञ अमेरिकेंत जर्मन युद्धसाहित्या-संबंधीं माहिती देण्यासाठी काम करीत आहेत. आणखी १२० जर्मन शास्त्रज्ञ आणविण्यांत येतील.

### मोटारउतारूंचा विमा

१ जुलै १९४६ पासून मोटारींच्या अपघातामुळें जखमी अथवा मृत्यू पावलेल्या प्रत्येक उतारूला नुकसानभरपाई करण्यासाठी प्रत्येक मोटारगाडीचा विमा उतरलाच पाहिजे असा हिंदुस्थानांत कायदा झाला आहे.

### हिंदुस्थानांतील अमेरिकन सैनिक

हिंदुस्थानांतील अमेरिकन सैन्य काढून घेण्यांत येत आहे, जून १९४६ पूर्वी अमेरिकन सैनिकांची संख्या ६०० सुद्धां उरणार नाहीं.

### कपाशीच्या निर्गतीसाठी चीनला कर्ज

चीनमधील गिरण्यांना अमेरिकन कपास खरेदी करतां यावी, ह्यासाठी ३३ कोटि डॉलर्सचें कर्ज बँक ऑफ चायनाला देण्यांत यावयाचें आहे. व्याजाचा दर २३% आहे. आगबोटी, रेल्वे सामान इत्यादींच्या खरेदीसाठी आणखी ३३ कोटि डॉलर्स चीनला उपलब्ध केले जातील.

### नवी यंत्रसामुग्री

अमेरिकेंतील कारखानदारांनीं १९४६ च्या पहिल्या तिमाहींत २१० कोटि डॉलर्स किंमतीची नवी यंत्रसामुग्री बसविण्याचें योजिलें होतें.

### मोटारींच्या टायर्सचें उत्पादन

अमेरिकेंत १९४५ सालीं २ कोटि ८१ लक्ष टायर्सचें उत्पादन झालें. १९४६ सालीं ६ कोटि ६ लक्ष टायर्स तयार होतील. ह्या सर्व टायर्स तात्काळ विकल्या जात आहेत.

### " मी अमेरिकन आहें "

रविवार ता. १९ मे हा दिवस " मी अमेरिकन आहें " दिन म्हणून साजरा करण्यांत यावा, असें प्रेसिडेन्ट ट्रूमन ह्यांनीं जाहीर केलें आहे. इतर देशांत जन्मलेले परंतु आतां अमेरिकन नागरिक बनलेले अशा हजारों लोकांनीं युद्धकार्यांत एकोपा दाखविला, त्याबद्दल त्यांचा जाहीर सन्मान करण्यासाठी ही योजना आहे.


दररोज लागणारे
—ताजे—
दही शेरास ८ आणे

म. गो. कुलकर्णी
किराणा–भुसार मालाचे व्यापारी
फडतरे चौक, सदाशिव पेठ, पुणें २










# मुंबई सरकारचें १९४६–४७ चें अंदाजपत्रक

मुंबईच्या गव्हर्नरांनीं मुंबई प्रांताचें चालू सालचें अंदाजपत्रक गेल्या आठवड्यांत सादर केलें. या अंदाजाविषयीं दोन प्रमुख बाबींकडे त्यांनीं लक्ष वेधलें. एक तर मुंबई प्रांताचें हें शेवटचें युद्धकालीन अंदाजपत्रक आहे. दुसरी गोष्ट अशी कीं, काँग्रेस मंत्रिमंडळाच्या राजीनाम्यानंतर प्रांताचा कारभार हिंदुस्थानच्या घटना कायद्याच्या ९३ कलमाप्रमाणें चालूं लागला. हें अंदाजपत्रक या कलमाखालील शेवटचेंच ठरणार आहे. अर्थातच या अंदाजपत्रकांत काँग्रेस मंत्रिमंडळ अधिकारारूढ झाल्यावर कांहीं फेरफार होण्याची शक्यता ध्वनित करण्यांत आली आहे. मागील अंदाजपत्रकांत समाविष्ट केलेले सर्व कर तसेच रहाणार असून त्याशिवाय विक्रीकर, शहरांतील मालमत्तेवरील कर पुणें शहरावर बसविण्यांत येणार आहे. विक्रीकर १ जुलैपासून आकारण्यांत येणार असून त्याचें अंदाजी उत्पन्न रु. ८२॥ लाख धरण्यांत आलें आहे. मालमत्तेवरील करापासून ४ लाख रुपयांच्या उत्पन्नाची अपेक्षा करण्यांत आलेली आहे. अंदाजपत्रकांत जमेच्या बाजूला ३० कोटी १९ लाख ८७ हजार रुपये दाखविण्यांत आलेले असून खर्चाचा अंदाज ३० कोटी १४ लाख ७३ हजार रुपये इतका करण्यांत आलेला आहे. या खर्चाच्या आंकड्यांत कर्जफेडीच्या निधीसाठी ३ कोटी रुपये व २। कोटी रुपये युद्धोत्तर पुनर्रचना योजनेसाठी, मिळून ४। कोटींचा समावेश करण्यांत आलेला आहे. या दोन निधींत नवीन पडणारी भर जमेस धरली तर निधींतील रकमा अनुक्रमें रु. ६ कोटी व १३। कोटी इतक्या होतात. अंदाजपत्रकांत अखेर शिल्लक रु. ५,१४,००० एवढी दाखविण्यांत आलेली आहे. अंदाजपत्रक तयार झाल्यानंतर इलाख्यांतील धान्यपरिस्थिति एकंदरीनें समाधानकारक राहिली नाहीं. त्यामुळें इलाख्यांतील दुष्काळग्रस्त भागासाठी मोठ्या खर्चाची तरतूद करावी लागणार आहे. प्रस्तुत अंदाजपत्रकाची १९३९–४० च्या अंदाजपत्रकाशीं तुलना करण्यांत आली असून उत्पन्न सुमारें २॥ पटीनें व खर्च (कायमनिधींतील भर सोडून देऊन) दुपटीपेक्षां थोडा अधिक होईल असा अंदाज केलेला आहे.

अंदाजपत्रकांत शिल्लक दाखविण्यांत आलेली आहे एवढीच गोष्ट लक्षांत घ्यावयाची म्हटलें तर मुंबई प्रांताची आर्थिक परिस्थिति एकंदरीनें, बंगालसारख्या तुटीचें अंदाजपत्रक असलेल्या प्रांतापेक्षां बरी आहे असें म्हणावें लागेल. व्यक्तीच्या आर्थिक परिस्थितीचें विवेचन करतांना अर्थशास्त्रांत पैशाचें वेतन (Money Wages) आणि वस्तू अगर सुखसोयींच्या रूपानें मिळणारें वेतन (Real Wages) असा फरक करण्याचा प्रघात आहे. आणि पैशाच्या स्वरूपांत मिळणाऱ्या वेतनांत वाढ झालेली असली तरीसुद्धां, वस्तूंच्या किंमतींत वाढ झाल्यामुळें व्यक्तींची जर आर्थिक ओढाताण झाली असेल, तर व्यक्तींची आर्थिक परिस्थिति समाधानकारक नाहीं असें मानण्यांत येतें. सामाजिक अर्थशास्त्राच्या दृष्टीनें विवेचनाची हीच पद्धत शास्त्रीय आणि वस्तुस्थितीवर प्रकाश पाडणारी म्हणून उपयुक्त आहे. पण राष्ट्राचें अगर प्रांताचें अंदाजपत्रक तयार करतांना अशा तऱ्हेची दृष्टि अद्याप स्वीकारण्यांत येत नाहीं. पुष्कळदां आभासमय प्रगति झाल्याचा गैरसमज होणें शक्य असतें.

मुंबई प्रांताच्या अंदाज-पत्रकांत फक्त दोन बाबतींत अशी दृष्टि कांहीं प्रमाणांत स्वीकारण्यांत आल्याचें दिसून येतें. पुण्याच्या इंजिनिअरिंग कॉलेजमध्यें पदवीच्या अभ्यासक्रमांत ५० अधिक विद्यार्थ्यांची आणि प्रशस्ति–पत्रकाच्या (Diploma) अभ्यासक्रमांत ५० अधिक विद्यार्थ्यांची सोय करण्यांत आलेली आहे. प्रांतिक पुनर्रचनेच्या कामांत या इंजिनिअर्सची जरूर लागेल त्या दृष्टीने विद्यार्थ्यांच्या संख्येंत केलेल्या या वाढीचें स्वागत करणें योग्य होईल. याशिवाय मुंबईच्या व्हिक्टोरिया ज्युबिली टेक्निकल संस्थेला ७ लाख ९० हजार ५०० रुपयांची देणगी इलेक्ट्रिक ग्रिडसाठी तंत्र-विशारद शिकवून तयार करण्यासाठी देण्यांत आलेली आहे. महाराष्ट्रांत फार मोठ्या प्रमाणांत वीज उत्पन्न करतां येईल व तिचा उपयोग करून सामान्यतः दरिद्री असलेला महाराष्ट्र अधिक संपन्न होईल हा विचार आत तज्ज्ञांना मान्य झालेला आहे. म्हणून या देणगीबद्दलहि सरकारचें अभिनंदन करणें युक्त ठरेल. आगामी काँग्रेस सरकार महाराष्ट्रांतील संभाव्य वीजपुरवठ्याच्या योजनेकडे लक्ष देईल तर तें मुंबईच्या इलाख्याच्या दृष्टीने सुद्धा हिताचें ठरणार आहे. याशिवाय पाणीपुरवठा, रोगप्रतिबंधक उपाय, इस्पितळें, सांडपाण्याचा निकाल, शिक्षण, शास्त्रीय संशोधन इत्यादि राष्ट्रसंवर्धक बाबींना मदत म्हणून रकमा खर्चाच्या अंदाजाकडे धरलेल्या आहेत. परंतु सध्यां पैशाचा सुकाळ आणि वस्तूंची दुर्मिळता अगर महर्गता अशी स्थिति असल्यामुळें इलाख्यांतील जनतेला या खर्चाचा प्रत्यक्ष उपयोग किती होईल हें आजच सांगतां येण्यासारखें नाहीं.

नवीन बसविलेल्या विक्री-करासंबंधीं विरोधक असा एक मुद्दा मांडतात कीं आतां नवीन मंत्रिमंडळ अधिकारपदावर येईल त्यावर हा कर बसविणें न बसविणें सोपवावें. हा कर १० हजार रुपयांच्यावर वार्षिक उलाढाल करणाऱ्या व्यापाऱ्यांवर बसविण्यांत येणार असून त्यांतहि धान्य व स्वस्त कापड यांना विक्रीकरांतून वगळण्यांत आलेलें आहे. युद्धोत्तर पुनर्रचनेसाठी कोणत्याहि सरकारला पैसा हा लागणारच व तो कर बसवून वसूल करणेंच युक्त. पण विक्रीवरील कराचा बोजा व्यापाऱ्यांनीं गिऱ्हाइकावर लादूं नये म्हणून कर बसलेल्या वस्तूंच्या किंमतीही नियंत्रित केल्या पाहिजेत. एरवीं अप्रत्यक्षपणें हा कर गिऱ्हाइकावर बसवल्यासारखें होईल. सध्याच्या महर्गतेच्या परिस्थितींत सामान्य माणसाच्या दृष्टीनें असें होणें अत्यंत अनिष्ट आहे. पुण्यांतील इमारतींवर बसविण्यांत येणाऱ्या कराचीही अशीच स्थिति आहे. आज भाडेनियंत्रण कायदा जारी असल्याने भाडेकरूंवर या कराचा बोजा पडणार नाहीं. परंतु पुढें मागें कायद्याची अंमलबजावणी संपल्यावर पुण्यांतील घरमालक कराचें ओझें भाडेकरूंच्या खांद्यावर लोटण्याचा प्रयत्न करण्याचा संभव आहे. तसें होऊं नये हें कर बसविण्याच्या आधुनिक शास्त्रीय पद्धतीला अनुसरून असेंच आहे. त्या दृष्टीनें सरकारनें योग्य वेळीं जरूर ती उपाययोजना केली पाहिजे.

---

### श्री. धरमसी खटाव

मुंबईच्या मिल ओनर्स असोसिएशनचे अध्यक्ष, श्री. धरमसी एम. खटाव, हे ४० लिमिटेड कंपन्यांचे डायरेक्टर आहेत.

### कंपनी कायद्यांत कोणती सुधारणा हवी ?

कंपनी कायद्याच्या अंमलबजावणीसंबंधीं चौकशी व अभ्यास करून त्या कायद्यांत दुरुस्ती सुचविण्याचें काम हिंदुस्थान सरकारनें मुंबई येथील सॉलिसिटर, श्री. त्रिकमदास द्वारकादास, ह्यांचेकडे सोपविलें आहे.

### हिंदुस्थानला प्रे. ट्रूमन यांचें आश्वासन

हिंदुस्थान सरकारच्या वतीनें संयुक्त अन्न-धान्य समितीकडे आपल्या मागण्या सादर करण्यासाठी गेलेले सर रामस्वामी मुदलिआर यांना प्रे. ट्रूमन यांनीं असें आश्वासन दिलें कीं, हिंदुस्थानला शक्य ती सर्व मदत अमेरिका करील, इतकेंच नव्हे तर आश्वासनापेक्षां थोडी अधिक मदतहि करण्याची आमची तयारी आहे. प्रे. ट्रूमन यांची गांठ घेतल्यावर सर साहेबांनीं असें सांगितलें कीं, सध्यां अन्न-धान्य समितीपुढें हिंदुस्थानला याव-याच्या अन्न-धान्याची चर्चा होत आहे. या चर्चेत जी किमान मागणी आम्हीं केली आहे ती मिळाली तरीसुद्धां हिंदुस्थानांत दर आठवड्याला बारा औंसाच्या शिध्याची (गव्हाची) व्यवस्था चालू ठेवणें शक्य होणार नाहीं. अन्न-धान्याच्या बाबतींत समिती-कडून पुरेसें व समाधानकारक काम होण्याचीं चिन्हें दिसत नसलीं तरी अमेरिकेंतून कणीक व इतर पिठांची मदत होणार असून कोणत्या देशाला किती द्यावयाचें या बाबतींत निर्णय घेण्यांत आले आहेत.

चीनचे प्रतिनिधि टिंग-फू-यँग यांनीं समितीपुढें अशी तक्रार मांडली कीं चीनपेक्षां इटलीला अधिक धान्य पाठविण्यांत येत आहे. गेलें महायुद्ध सुरू होण्यापूर्वीच चीन जपानशीं लढत होता हें लक्षांत घेतां चीनला अधिक धान्य-पुरवठा व्हावयास पाहिजे असा युक्तिवाद त्यांनी केला. १ ऑगस्ट १९४६ पूर्वी चीनला ४ लक्ष टन तांदूळ व ५ लक्ष टन गहूं मिळावयास पाहिजे. आतांपर्यंत फक्त ९२०० टन तांदूळ व १ लक्ष ७८ हजार टन गहूं चीनला मिळाला आहे. यावरून चीनमधील धान्य-परिस्थिति बिकट असल्याचें दिसून येतें, रशियाकडून फ्रान्सला ६ लक्ष टन धान्याचें आश्वासन मिळालें आहे. त्यावरून रशिया-जवळ शिलकी धान्य असावें असें वाटतें, परंतु रशिया संयुक्त-धान्य समितीचा सभासद नसल्यानें त्या बाबतींत रशियन सर-कारवर जबाबदारी अशी नाहीं.

---

### स्पेनला गहूं कोठून मिळतो ?

वॉशिंग्टन येथें सध्यां संयुक्त राष्ट्रसंघाच्या अन्न-समितीच्या बैठका चालू असून दुष्काळाच्या भीतीनें ग्रासलेल्या राष्ट्रांचे प्रतिनिधि आपापल्या देशासाठी निदान उपासमार टाळण्या-पुरत्या अन्नधान्याची मागणी करीत आहेत. दुष्काळाचे दूरगामी परिणाम या समितीला चांगले माहीत असून अन्न-धान्याच्या वांटणीच्या व त्वरित वाहतुकीच्या कामीं जितकी दक्षता बाळ-गावयास पाहिजे तितकी बाळगली जात नाहीं, आणि या चाल-ढकलीमागें कांहीं राजकीय हेतु असावा अशी शंकाहि ठिक-ठिकाणीं व्यक्त करण्यांत येत आहे. या बाबतींत दक्षिण अमे-रिकेंतील अर्जेंटायना या देशाचें उदाहरण मुद्दाम लक्षांत ठेवण्या-सारखें आहे. संयुक्त अन्न-धान्य समितीचें सभासदत्व अर्जेंटाय-नानें गेल्या डिसेंबरमध्यें स्वीकारलें. एकदा सभासदत्व स्वी-कारल्यावर अन्न-धान्य समिति सांगेल त्याप्रमाणें शिलकी धान्याचा पुरवठा करण्यास अर्जेंटायनाचें सरकार बांधलें गेलें पाहिजे. पण या प्रकरणांत संयुक्त राष्ट्रसंघ योग्य ती उपाय-योजना करण्यास अजूनपर्यंत असमर्थ ठरला आहे. अर्जेंटायना-कडून स्पेनला गव्हाचीं जहाजें जात आहेत. स्पेनमधील फॅसिस्ट राजवट इंग्लंड व अमेरिकन सरकारांना तत्त्वतः अमान्य असून सुद्धां अर्जेंटायनावर दडपण आणून त्या देशांतील शिलकी गहूं हिंदुस्थान चीनसारख्या दुष्काळग्रस्त देशांसाठी पैदा करण्याचे प्रयत्न संयुक्त राष्ट्रसंघामार्फत होत नाहींत. स्पेनमधील फ्रँकोचा अमल अप्रत्यक्षरीत्या जगविण्याचें कार्य इंग्लंड-अमेरिका करीत आहेत असा आरोपहि या प्रकरणांत करण्यांत येऊं लागला आहे.

---

### प्रां. सहकारी बँकेचे मॅनेजर श्री. देवधर ह्यांचा मृत्यु !

मुंबई प्रां. सहकारी बँकेचे मॅनेजर श्री. एस. जी. देवधर, बी.ए. हे थोड्या आजारानंतर नुकतेच मरण पावले, हें नमूद करण्यास दुःख होतें. फर्ग्युसन कॉलेजांतून बाहेर पडल्यानंतर कांहीं काळ त्यांनीं शिक्षकाचें काम केलें. श्री. गोपाळ कृष्ण देवधर ह्यांनीं कै. देवधर ह्यांचें कर्तृत्व सर लल्लुभाई सामळदास ह्यांचे नजरेस आणवून दिल्यानंतर त्यांची प्रां. सहकारी बँकेंत १९१९ सालीं नेमणूक झाली. सहकारी चळवळींत त्यांनीं लक्ष घालून वेग-वेगळ्या जिल्ह्यांत १९३६ पर्यंत काम केलें. १९३८ सालापासून ते बँकेचे मॅनेजर म्हणून काम करीत होते. जनतेच्या सेवेचें एक साधन ह्या दृष्टीनें ज्या थोड्यांनीं बँकेंत पाऊल टाकलें, त्यांपैकी ते एक होते. श्री. वैकुंठराय मेहता ह्यांस त्यांचें अतिशय सहाय होत असे. इन्स्पेक्टर ह्या नात्यानें शेतकऱ्यांत वावरतांना त्यांचेशीं सलोख्यानें वागून त्यांचा त्यांनीं विश्वास संपादन केला होता आणि बँकेच्या चालकांचाहि त्यांचेवर पूर्ण विश्वास होता. बारामती आणि अहमदनगर या कालवा विभागांतील त्यांचें काम बँकेच्या अडचणीच्या प्रसंगीं बहुमोल झालेलें आहे. गेल्या सहा वर्षांतील बँकेच्या प्रगतीचें बरेंचसें श्रेय श्री. देवधर ह्यांस आहे. त्यांच्या अकाली मृत्यूमुळें बँकेचें व सहकारी चळवळीचें अतिशय नुकसान झालें आहे.

---

### पुणें जिल्हा दुष्काळनिवारण समितीची कार्यकर्त्यांना विनंति

पुणें जिल्ह्यांतील भिमथडी, इंदापूर, दौंड, शिरूर व हवेली ह्या भागांतील सुमारें २२५ गांवांना दुष्काळी परिस्थिति लागू झाल्याचें मुंबई सरकारनें जाहीर केलें आहे. तेथील जनतेस शक्य तें सहाय करण्यासाठी पुणें येथें वरील दुष्काळनिवारण समिति स्थापन झाली आहे. दुष्काळी विभागांतील स्थानिक कार्यकर्ते व स्वयंसेवक ह्यांनीं कृपा करून आपलीं नांवें व पत्ते हीं समिती-कडे पाठवावींत, म्हणजे त्यांचेकडे मदतीचीं कामें सोपविलीं येतील, अशी समितीची विनंति आहे. पिण्याच्या पाण्याच्या अडचणी व त्यावर उपाययोजना ह्याविषयींहि माहिती समितीकडे पाठवावी. उपाययोजनेंत डोहरे खणणें, पहारी लावणें व मोटारींचे सहाय्यानें पाणीपुरवठा करणें, ह्यांचा समावेश होतो.

पत्ता—C/o पुणें सें. को. बँक लि. पुणें २.

---

### मुंबईचा दूध-पुरवठा

मुंबई शहर व उपनगरें ह्यांतील दूध-पुरवठ्याची सद्यःस्थिति आणि ती सुधारण्याची योजना वर्णन करणारें हें चोपडें मुंबई सरकारच्या मिल्क कमिशनरनें तयार केलें आहे. चित्रें व तक्ते ह्यांच्या सहाय्यानें दूध-पुरवठ्याचा प्रश्न त्यांत उत्कृष्ट रीतीनें समजावून सांगण्यांत आला आहे, हें २४ पृष्ठांचें चोपडें कोणा-सहि मोफत मिळेल. डायरेक्टर ऑफ इन्फर्मेशन, चर्चगेट, मुंबई, ह्या पत्त्यावर मागणी करावी.

### बँकांवर गुंडांची धाड

कांहीं दिवसांपूर्वी झालेल्या मुंबई येथील दंग्यांत कांहीं गुंडांनीं ५ बँका लुटल्या. एका बँकेच्या मॅनेजरास एका तरुणानें वाचवलें व गुंडांच्या हातीं गेलेली तिजोरीची किल्ली परत मिळविली. तिजोरींत १ कोटि रुपये रोख होते !

# स्फुट विचार

### मध्यवर्ती विधिमंडळांत फिनॅन्स बिल मंजूर

१९३५ सालीं कॉंग्रेसचे प्रतिनिधी मध्यवर्ती विधिमंडळांत उपस्थित झाल्यापासून दरवर्षीचें फिनॅन्स बिल सर्वसाधारण चर्चेच्या वेळींच नामंजूर होऊन गव्हर्नर जनरलकडून खास अधिकारांत मंजूर करविण्यांत येत असे. १९४६ सालचें फिनॅन्स बिल मात्र विधिमंडळांतील मुस्लीम पक्षाच्या पाठिंब्यामुळें कलमवार चर्चा होऊन मंजूर झालें. अर्थचिटणीस सर आर्चिबाल्ड रोलंडस यांनीं अंदाजपत्रक मांडलें त्यावेळीं अंदाजपत्रक श्रीमंतांना अनुकूल आहे अशी टीका विरोधी पक्षाकडून करण्यांत आली होती, तशाच प्रकारची टीका यावेळीं करण्यांत आली. त्या टीकेस अर्थचिटणीसांनीं मामुली उत्तर दिलेंच परंतु विरोधी यथार्थता प्रत्यक्ष कृतीनें मात्र कबूल केली. ता. १ जुलै १९४६ पासून पोस्ट कार्डाची किंमत तीन पैशांवरून दोन पैशांवर आणण्यांत येईल. रॉकेलच्या प्रत्येक गॅलनवर बसविण्यांत आलेल्या करांत ९ पैची सूट मूळ अंदाजपत्रकांत जाहीर केली होती. ही सूट आतां १॥ आणा करण्यांत आली आहे. काड्याच्या पेटीची किंमत ३ पैशांच्या ऐवजीं दोन पैसे ठेवण्यांत येणार आहे. सुपारीवरील कर अजिबात रद्द करण्यानें उत्पन्न घटेल असें सांगून मिठावरील करहि त्याच कारणासाठीं रद्द करतां येत नाहीं असें ते म्हणाले. मिठावरील करापासून दरसाल ८ ते ९ कोटी रुपये उत्पन्न सरकारला होतें. आगामी काळांत युद्धोतर योजना वगैरेसाठीं मध्यवर्ति सरकारला पैशाची गरज मोठ्या प्रमाणावर लागेल. असे उत्पन्न देणारे कर फार कमी अगर पूर्णपणें रद्द करणें योग्य होणार नाहीं असा त्यांच्या विवेचनाचा सारांश आहे. युद्धखात्यावरील खर्चापैकीं किती खर्च ब्रिटिश सैनिकांवर होतो असा प्रश्न विरोधी पक्षाचे नेते श्री. शरचंद्र बोस यांनीं विचारला असतां २० कोटी रुपये असें उत्तर देण्यात आलें. आतां युद्ध संपलें असल्याने हिंदुस्थानांतील ब्रिटिश लष्कर काढून घेण्यांत आलें तर या २० कोटी रुपयांची बचत होईल असें श्री. बोस यांनी सुचविलें. युद्धखर्चासाठीं वाटेल तेवढा पैसा उभा केला गेला, परंतु युद्धोत्तर आर्थिक योजनांसाठीं फक्त ५० कोटि रुपयांची तरतूद करण्यांत आली. यावरून या योजनांसंबंधीं सरकारला मनापासून आस्था वाटत नसावी असा संशय श्री. बोस यांनीं व्यक्त केला.

---

### संयुक्त-अन्नधान्य समितीची हिंदुस्थानला मदत

मध्यवर्ती असेंब्लींत अन्नमंत्रि सर ज्वालाप्रसाद श्रीवास्तव यांनीं असें जाहीर केलें कीं, "वॉशिंग्टनमधील संयुक्त-अन्नधान्य समितीकडून हिंदुस्थानतर्फे मागणी करण्यांत आलेल्या धान्याच्या निम्याहून थोडें अधिक धान्य मिळणार असल्याचें आश्वासन देण्यांत आलें. १९४६ च्या पहिल्या सहा महिन्यांत १४ लाख टन गहूं आणि १५ लाख टन तांदूळ मंजूर करण्यांत आला आहे. हें धान्य हिंदुस्थानांत पोचल्यावर जरूर त्या त्या ठिकाणीं पोंचविण्यासाठीं वहातुकीची व्यवस्था करण्यांत आली आहे, परंतु अन्न-धान्यसमितीकडून धान्य हिंदुस्थानांत पोचविण्यासाठीं बोटींची व्यवस्था लवकर होईल कीं नाहीं याविषयीं मात्र कांहीं सांगतां येत नाहीं. सर श्रीवास्तव यांनीं व्यक्त केलेली वहातुकीच्या साधनांबद्दलची शंका खरी ठरली तर नुसत्या मंजुरीचा हिंदुस्थानला उपयोग काय? वहातुकीला पुरेशीं जहाजें नाहींत हें पटण्यासारखें नाहीं. पॅसिफिक महासागरांत अॅटम बॉंबचा युद्ध-नौकांच्या काफिल्यावर काय परिणाम होतो हें पहाण्यासाठीं किती तरी लढाऊ बोटींचा प्रयोगादाखल नाश करण्यांत येणार आहे. या बोटींतून हिंदुस्थानांत धान्य पोंचवितां येणार नाहीं काय? वॉशिंग्टनला हिंदुस्थान सरकारतर्फे गेलेले सर रामस्वामी मुदलियार यांनीं हिंदुस्थानच्या उरलेल्या मागणीबद्दल फारसा आशावाद दाखविलेला नाहीं. तथापि सयामकडून तांदूळ मिळण्याच्या शक्यतेचा उल्लेख त्यांनीं लंडनला परत आल्यावर केला आहे. हिंदुस्थानकडून सयामला कापड पुरवून त्याच्या मोबदला तांदूळ मिळविता येईल. परंतु सयाममधील अनिश्चित राजकीय परिस्थितीमुळे तेथील शेतकऱ्यांचा पेशावरील विश्वास उडाला आहे. त्याचा परिणाम असा झाला आहे कीं, आपल्या जरूरीपेक्षा अधिक धान्य न विकविण्याकडे व असलेलें धान्य सांठवून ठेवण्याकडे लोकांची प्रवृत्ति होत आहे. अर्जेंटायनांत परवां परवांपर्यंत गहूं रेल्वे इंजिनांना जळण म्हणून वापरण्यांत येत होता. या विलक्षण प्रकाराचा उल्लेख सरसाहेबांनीं केला असून अर्जेंटायनामधील राजकीय वातावरणाचा हा परिणाम असल्याचें सांगितलें. उत्तर युरोपांत पुढील पीक चांगलें येईल असा अंदाज आहे. तो खरा ठरल्यास युरोपमधील शिधा आशियांतील दुष्काळग्रस्त देशांना वाटतां येण्याची शक्यता आहे.

---

### अन्नपुरवठा वाढविण्याचे प्रयत्न

वेगवेगळ्या देशांत अन्नाचा पुरवठा वाढविण्याचे प्रयत्न कसे चालले आहेत, हें सांगणारा अमेरिकन शेतकी खात्याचा रिपोर्ट प्रसिद्ध झाला आहे. त्यावरून असें दिसतें कीं, युरोपांतील शेतकरी उत्पादन वाढविण्याचा कसून प्रयत्न करीत आहेत. शहरी लोक त्यांना सहाय्य करीत आहेत. कित्येक कचेऱ्या संध्याकाळीं मुद्दाम लवकर सोडण्यांत येतात, त्याचा उद्देश त्यांतील नोकरांना शेतकामास वेळ मिळावा, हा आहे. अवजारें व वहातुकीचीं साधनें ह्यांचा अभाव आणि धान्याचा अपुरा पुरवठा ह्या अडचणी तेथें आहेतच. आशियांत विशेषतः पूर्व आशियांत, दुष्काळाची तीव्रता भयंकर जाणवणार आहे. जूनमध्यें पावसाळ्यास प्रारंभ होईपर्यंत हिंदी शेतकऱ्यास स्वस्थ बसावें लागत आहे, ही दुर्दैवाची गोष्ट आहे. चीनमध्यें उत्पादन वाढविण्याचे प्रयत्न गेलीं कित्येक वर्षे चालू आहेत.

---

### युद्धांत जंतुशास्त्राचा उपयोग

रोगांचा फैलाव करून प्राणहानि कशी करतां येईल, ह्याचें संशोधन जर्मन व जपानी जंतुशास्त्रज्ञ १९३९ पूर्वीहि करीत होते. मे १९४२ पासून ब्रिटिश, अमेरिकन व कनेडियन शास्त्रज्ञांनींहि बचावाच्या योजनांचें संशोधन सुरू केलें व त्यांत त्यांना आरोग्य, शेती, उद्योगधंदे इत्यादींस उपयुक्त अशी माहिती मिळाली. अॅटम बॉंबाविषयीं संशोधन करण्यास मोठा खर्च येतो व उत्पादनाच्या सोयीहि लागतात. ह्या उलट जंतु-शास्त्राच्या संबंधीं संशोधन लहान मोठ्या, गरीब-श्रीमंत अशा सर्व देशांत गुप्तपणें सहज करतां येईल. तेव्हा ही विद्या मनुष्याचा संहार करण्याकडे उपयोगांत आणली जाऊं नये, ह्याविषयीं दक्षता बाळगणें फार अवघड आहे, असें मि. जॉर्ज मर्क ह्या अमेरिकन शास्त्रज्ञानें आपलें मत व्यक्त केलें आहे.

## अखिल हिंदुस्थानांतील अर्थव्यवहारांवर परिणामकारक होणारा नवा निर्णय

### मुंबई हायकोर्ट निर्णय देतें कीं पक्का अडत्या हा कांहीं आपल्या घटक व्यापाऱ्याचा एजंट नाहीं !

मुंबई हायकोर्टाचे सर न्यायाधीश सर लिओनार्ड स्टोन, आणि न्यायमूर्ति श्री. लोकूर व मि. मॅक्लिन यांच्या संयुक्त मंडळानें देशांतील व्यापारी अर्थव्यवहारावर परिणामकारक ठरणारा एक महत्त्वाचा निर्णय नुकताच दिला आहे. हा निर्णय मुंबईतील पक्क्या अडत्यांच्या व्यवहारासंबंधानें आहे; यासाठीं पक्का अडत्या म्हणजे काय त्याचा थोडा खुलासा करणें आवश्यक आहे.

पक्के अडते हे मुंबईसारख्या मुख्य व्यापारी केंद्रांत असतात व त्यांचे प्रत्येकाचे घटक व्यापारी देशावर असतात. हिंदुस्थान देशांत कोठल्याहि ठिकाणीं असणारे हे घटक-व्यापारी मुंबई सारख्या केंद्रांतील पक्क्या अडत्यास आपल्यासाठीं विशिष्ट माल खरेदी करून अथवा आपला विशिष्ट माल विकून त्याची रवानगी अथवा पोंच ठरविण्यांत आलेल्या कांहीं मुदतीनंतरच्या निश्चित वेळीं देण्याचा करार करतात. एकदां असा करार झाला कीं, ठरलेल्या वेळीं पक्क्या अडत्यानें मालाची रवानगी अथवा स्वीकार करावयाचा असतो अथवा करारांत ठरलेल्या मालाच्या किंमतींत आणि त्या वेळच्या बाजारभावांत ज्याप्रमाणें चढउतार असेल त्याप्रमाणें आपल्या घटक व्यापाऱ्यांस पडणाऱ्या फरका इतके पैसे द्यावयाचे वा घ्यावयाचे असतात. सारांश पक्क्या अडत्याचे व्यवहार म्हणजे घटक व्यापाऱ्यांशीं करार करून माल अथवा किंमतींतील फरक देण्याघेण्याचे असतात. यामुळें घटक व्यापाऱ्यांशीं करार करतांना पक्क्या अडत्यांजवळ माल अथवा मालासाठीं गिऱ्हाईक तयार असावेंच लागतें असें नाहीं. घटक व्यापाऱ्यांशीं प्रथम करार करून नंतर त्या घटक व्यापाऱ्यांचा माल खपविण्यासाठीं अथवा त्यांना लागणारा माल खरेदी करून आणण्यासाठीं अन्य व्यापाऱ्यांशीं सावकाशपणें व स्वतंत्रपणें पक्क्या अडत्यांना करार करतां येतात. त्यांची जबाबदारी पक्का माल अथवा मालाऐवजीं किंमतींतील फरक तेवढा भरून देण्याघेण्याची असते. यावरूनच पक्के अडते हे आपल्या घटक—व्यापाऱ्यांचे एजंट असूं शकत नाहींत तर स्वतंत्र व्यापारीच असतात हें उघड दिसून येईल.

अशी वस्तुस्थिति असतांना पक्क्या अडतीचे नेहमीच्या पद्धतीचे पांच करार ठरून त्यांचीं टिपणें पाठविण्यांत आलीं होतीं. त्यांवर प्रत्येकीं चार आणे प्रमाणें स्टँप लावणें आवश्यक आहे असा मुंबईच्या मुख्य रेव्हेन्यू अधिकाऱ्यांनीं आग्रह धरला व मग हें प्रकरण कोर्टांत गेलें.

स्टॅम्प ॲक्टाच्या पांचव्या नियमाप्रमाणें करारावर अथवा कराराच्या टिपणावर स्टॅम्प भरावा लागतो. परंतु या नियमांतून मालाच्या खरेदी विक्रीचे करार अपवाद म्हणून वगळण्यांत आले आहेत. त्यानंतर स्टॅम्प ॲक्टचा ४३ नियम असा आहे कीं, मुख्य व्यापाऱ्यांस त्याच्या ब्रोकर अथवा एजंटानें केलेल्या मालाच्या खरेदीसंबंधीं अथवा विक्रीसंबंधीं जीं टिपणें अथवा याद्या पाठविल्या असतात त्यावर स्टॅम्प भरणें आवश्यक आहे.

हा स्टॅम्प मुंबई प्रांतांत वीस रुपयांपुढील कितीही मालास चार आणे आहे. नियम ५ मध्यें मालाच्या खरेदी विक्रीचे करार अपवाद म्हणून वगळले आहेत परंतु त्याचा बाध नियम ४३ ला होत नाहीं. जे करार अथवा करारांचें टिपण नियम ४३ खालीं बसत नाहीं. त्याचाच तेवढा नियम पांचला अपवाद ठरूं शकतो. सारांश मालाच्या खरेदीविक्रीच्या सामान्य करारावर अथवा कराराच्या टिपणावर स्टॅम्प नाहीं. पण एजंटानें मालाची खरेदीविक्री करून त्याची जी याद वा नोंद आपल्या मुख्य व्यापाऱ्याकडे पाठविली असेल तीवर मात्र स्टॅम्प भरणें आवश्यक असतें.

मुंबईच्या चीफ कंट्रोलर ऑफ रेव्हेन्यू या अधिकाऱ्याचा दावा असा होता कीं, पक्का अडत्या हा आपल्या घटक व्यापाऱ्याचा एजंटच असतो व त्यानें पाठविलेल्या कराराच्या टिपणीवर त्यांनीं नियम ४३ खालीं स्टॅम्प भरणें भाग आहे.

आपण वर पाहिलेंच आहे कीं पक्क्या अडत्याची जबाबदारी फक्त ठरलेल्या मुदतीनंतरच्या पुढील विशिष्ट वेळीं माल अथवा किंमतींतील फरक याची देवाणघेवाण करण्यापुरतीच असते; व माल वा फरक कांहींही देणें घेणें त्यास शक्य असतें यावरून पक्का अडत्या हा घटक—व्यापाऱ्याचा एजंट ठरत नाहीं.

मुंबई हायकोर्टानेंहि असाच निःसंदिग्ध निर्णय दिला आहे कीं, पक्का अडत्या हा स्वतंत्र व्यापारी आहे, कोणाचा एजंट नाहीं व म्हणून त्याचे घटक व्यापाऱ्यांशीं झालेले करार वा त्या करारांचीं टिपणें हीं नियम पांचच्या अपवादांत पडतात आणि नियम ४३ हा या करारांना वा करारांच्या टिपणांना लागूं पडत नाहीं. कारण हे करार करतांना अथवा केल्यावरही पक्का अडत्या मालाची प्रत्यक्ष खरेदीविक्री करीलच असें त्यावर बंधन नाहीं. सबब पक्क्या अडत्यानें पाठविलेले करार वा करारांचीं टिपणें यांवर कोणत्याही स्टॅम्पची आवश्यकता नाहीं.

अशा या निर्णयानें व्यापारी जगांत फार मोठ्या प्रमाणावर चालू असलेल्या अनंत व्यवहारांवर येऊं पहाणारें एक नवेंच गंडांतर दूर झालें आहे.

---

### बँकिंग बिल व सहकारी बँका

मध्यवर्ती असेंब्लींत हिंदुस्थान सरकारनें मांडलेलें नवें बँकिंग बिल सहकारी बँकांस लागू नाहीं.

### बँक ऑफ कराड, लि.

५ लक्ष रुपये भांडवलाची ही बँकिंग कंपनी सदर्न निटिंगचे चेअरमन शेठ काकुभाई वखारिया, यांनीं रजिस्टर केली आहे.

---

— शुद्ध कथिलानें कल्हई लावणारे —
केळकर कल्हईवाले
कल्हईचें काम प्रत्येकाचे घरीं जाऊन केलें जाईल
आजचा भाव
दररोजचीं भांडीं शेंकडा १० रुपये
नवीन भांड्याचा भाव भांडीं पाहून
पत्ताः—C/o डॉ. डी. जी. पटवर्धन
ना. गोखले चौक, पुणें ४

### आयुर्विमा कंपन्यावरील इनकम टॅक्स

कराचा भारी दर, सरकारी रोख्यांत सक्तीने गुंतवाव्या लागणाऱ्या पैशावर पडणारें अल्प व्याज, इत्यादि गोष्टींचा उल्लेख श्री. के. सी. देसाई ह्यांनी इंडियन असोसिएशनच्या गेल्या वार्षिक सभेंतील आपल्या अध्यक्षीय भाषणांत केला. १९४६–४७ मधील उत्पन्नावर आयुर्विमा कंपन्यांना रुपयांत ६० पै कर द्यावा लागेल, तो जास्तींत जास्त ४५½ पै पेक्षा अधिक असूं नये, असें त्यांनी प्रतिपादन केलें. आयुर्विमा कंपन्यांचो प्राप्तीवरील करास पात्र असलेली प्राप्ति ठरवितांना व्याजांतून व्यवस्थेचा खर्च वजा करण्यांत यावा असें त्यांनीं सांगितलें. इंग्लंडमध्यें हीच पद्धति अंमलांत आहे.

## मुंबई शेअर बाजार

( वि. म. लिमये आणि मं. यांजकडून )

वर्ग पुस्तकें बंद

नागपूर ५–४–४६ } २०–४–४६ }
स्वदेशी मिल्स १२–४–४६ } ४–५–४६ }

व्याज–वजा

कोहिनूर—२८-३.४६ अपोलो—२९-३-४६
डाइंग रु. ५० दि. ८–४–४६
गोकाक रु. ८ दि. ८–४–४६
नागपूर २९–४–४६
स्वदेशी १५–५–४६

| १९४५ मधील चढउतार | दिलेलें व्याज † खंडित S अंतिम | व्याज केव्हां मिळतें | कंपनीचें नांव | मूळ रु. | सोमवार २५।३।४६ | मंगळवार २६।३।४६ | बुधवार २७।३।४६ | गुरुवार २८।३।४६ | शुक्रवार २९।३।४६ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| २६०५; १९८० | १२९–८–९ | ऑगस्ट | टाटा डिफर्डस् | ३० | | २९७१—४ | २९६२—८ | २९७५—० | २९७६—४ |
| ४८०; ३७२ | २३–०–० | ऑगस्ट | टाटा आर्डिनरी | ७५ | | ५२५—८ | ५२३—० | ५२४—० | ५२६—० |
| २२२२-८; १७६३-१२ | ५०–०–०S | मार्च–सप्टें. | बॉम्बे डाईंग | २५० | | २३९७—८ | २३९७—८ | २३९१—४ | २३९३-१२ |
| ७०२; ५६६ | १९——०† | मार्च–सप्टें. | कोहिनूर | १०० | | ८००—० | ८०३—० | ७८७+ | ७८८—० |
| ६६८; ५०७ | २२–०–० | मे | स्वदेशी | १०० | | ७३१—८ | ७२८—० | ७२७—० | ७२४—० |
| ४३–८; ३६० | ५–०–०† | नोव्हें.–एप्रिल | नागपुर | १०० | | ४७१—८ | ४६५—० | ४६५—० | ४६४—० |
| ३४२–०; २७५ | १५–०–० | मार्च | फिनले | १०० | | ३८९—० | ३९१—० | ३८६—० | ३८७—० |
| ३३५; २८३-८ | ८–०–०S | ऑक्टो.–एप्रिल | गोकाक | १०० | | ३५०—० | ३५२—० | ३५५—० | ३५३—० |
| ३३७; २४३ | ४–०–०† | जाने.–जुलै | सिंप्लेक्स | ५० | बाजार | ३७५—० | ३७६—० | ३७७—८ | ३७७—० |
| ५; ३-११-० | ०–४–० | मार्च | अपोलो | २ | | ५—४ | ५—४ | ५—४–६ | ५—१-०+ |
| १७ १०; १३-७-० | ०–१५–८ | मे | इंडि. यु. ऑर्डि. | १० | बंद | १८–१५ | १८–१५–६ | १९—०–० | १९—४–० |
| ३-१०; २-९ | ०–३–० | मे | ,, डिफर्डस् | १ | | ३–१२ | ३–१२–६ | ३–१२–० | ३–१२–९ |
| ७९०; ६४५ | ३५–०–० | ऑगस्ट | इंदूर माळवा | १०० | | ७८७—८ | ७९२—८ | ७८७—८ | ७९१—४ |
| २४३–८; २०६-८ | ७–०–० | जानेवारी | असो. सीमेंट | १०० | | २५१—४ | २५२—० | २५०–१२ | २५८—० |
| २५६; २१३-८ | ८–०–० | जानेवारी | बेलापूर शुगर | ५० | | २६६—० | २६६—० | २६८—० | २७१—० |
| ५९२–८; ५१०-० | ७–८–० | डिसेंबर | बॉम्बे बर्मा | १२५ | | ६१७—८ | ६१७—८ | ६२०—० | ६२२—८ |
| ४३-७; ३०-१२ | ०–४–० | नोव्हेंबर | शिंदिया स्टीम | १५ | | ३६–१२ | ३६–१४ | ३७—१ | ३७—८ |
| | | | ३½% रोखे | १०० | | १०२—० | १०२—१ | १०२–१३ | १०३—४ |

सोमवार, दि. १ एप्रिलला बाजार बंद होता.



ASHA P.3 NINAD LTD.

सांडू प्रेग युटेरो
गरोदर स्त्री व गर्भ यांस पोषक
द.कृ.सांडू ब्रदर्स,चेंबूर,लिमीटेड.(चेंबूर,मुंबई)

पुणें चीफ एजंटसः—
मेसर्स श्री दत्त एजन्सी
१००, रविवार पेठ, मोती चौक, पुणें.

सर्व प्रांतांतील सुती, गरम व रेशमी खादीचा सुंदर संच

खादी मन्दिर

२६२, बुधवार पेठ, ढमढेरे बोळाजवळ, पुणें २

## रूरल प्रॉडक्टस कंपनीच्या प्रयत्नांची महात्मा गांधींकडून पहाणी

ता. ७ रोजीं महात्मा गांधी यांनीं लॉर्ड रे महाराष्ट्र इंडास्ट्रिअल म्युझिअमला भेट दिली. त्या वेळीं त्यांना फळापासून टिकाऊ पदार्थ करण्याच्या प्रयत्नांची माहिती रूरल प्रॉडक्ट्स् कं. चे मॅनेजिंग डायरेक्टर श्री. न. गं. आपटे यांनीं दिली व स्वत: करवून घेतलेली स्वदेशी यंत्रसामुग्री व टोमॅटो, संत्रीं व लिंबें यांपासून तयार केलेले पदार्थ दाखविले व वरील फळें त्यांतून कांहींहि वायां न जातां संपूर्णपणें कशीं उपयोगांत आणतां येतील तें सांगितलें. वरील प्रयत्नांबद्दल महात्माजींनीं समाधान व्यक्त केलें. श्री. प्यारेलाल यांनीं ता. ९ रोजीं श्री. आपटे यांच्याशीं आणखी एक तासभर या प्रयत्नामुळें किती खाद्यपदार्थ टिकवून ठेऊन लोकांना देतां येतील याबाबत चर्चा केली. श्री. आपटे यांनीं नुसत्या महाराष्ट्रांतील फळांबाबत जरा योग्य प्रकारचे प्रयत्न केले तर किमान १०।२० लाख शेर माल सहजच तयार होऊं शकेल व यास सरकारी सहाय्य मिळाल्यास ही गोष्ट सुलभ होईल असें सांगितलें.

---

## हिंदी कापडाची चीनला निर्यात

"युद्धोत्तरकाळीं चीनचा कापड व्यापार हिंदुस्थानच्या हातीं यावा म्हणून हिंदी कापड चीनला पाठविण्याची योजना हिंदी सरकारनें आंखली आहे. या योजनेप्रमाणें लवकरच साधें व तलम कापड शांघाय या चीनमधील बंदरास पाठविण्याची तजवीज करण्यांत येत आहे. तेथें हल्लीं असलेल्या बाजारभावाच्या एक चतुर्थांश किंमतीस हें कापड विकावयास परवडेल. हा धंदा करण्यासाठी कापड निर्यात करणारे ३० व्यापारी तयार असून त्याप्रमाणें माल उतरून घेण्यासाठी आपल्या शांघायमधील एजंटांना त्यांनीं तारा केल्या आहेत. एकदा ही योजना अमलांत आली म्हणजे एकसारखें हिंदी कापड चीनमध्यें जाऊं लागेल." मागें प्रसिद्ध झालेली ही वातमी बरोबर नाहीं असें आतां जाहीर झालें आहे.





पैसा आणि ज्ञान वाढवा !

श्रीमंत कसें व्हावें?—संपत्तीचा सुंदर मार्गदर्शक! हें भाग्यवर्धक पुस्तक हजारों रु. मिळवून देईल! किं. १॥ रु., यशाचा सूर्योदय—व्यापार उद्योगधंद्यांत नक्की यश कसें मिळवावें तें शिकवितें. किं. १॥ रु., काम आणि कामिनी—नैसर्गिक काम सौख्याचें सुंदर विवेचन करतें. किं. १॥ रु., मृत्युलोकचा प्रवास—अद्भुत कथानक! किं. १ रु.

—आजच लिहा—

मेसर्स—विपट आणि मंडळी,
पो० कराड, जि. सातारा.

शांतीलाल भगवानदास

टोप्यांचे व्यापारी

खास लग्नसराईकरितां हायक्लास रेडिमेड ब्लाऊज, फ्रॉक्स, पेटीकोट्स, बाबासूट व पंजाबी ड्रेस तयार मिळतील.
लेडीजचें शिलाईकाम वेळेवर करून मिळेल.
१७० बुधवार पेठ, पुणें २


ओलक ] फाफ मशिनच्या तोडीचीं [ ओलक

ओलक शिवण्याचीं यंत्रें

रोखीनें अगर हप्त्यानें मिळतात.

लिहा अगर भेटा:—व्ही. आर. बापट,
ओलक मशिन कं., लकडी पुलाजवळ,
लक्ष्मीरोड, पुणें नं. २

पेडणेकर आणि कंपनी लि.,



शिवण्याच्या यंत्रांचे व्यापारी
१७२ गिरगांव रोड, मुंबई.
फोन नं. २७३८२

बिनचूकच्या माहितीनें

स्त्रियांचें तारुण्य आणि लावण्य कायम टिकतें.
किं. रु. ३-९ व रु. ५-९. मा. पुस्तक आणे ४.
१२ आणे अगाऊ आल्यास औषध व्ही. पी. नें पाठवूं.
—धी बॉम्बे जनरल एजन्सी—
भायखळा पुल, मुंबई नं. २७.
पूना स्टॉकिस्ट: सिताराम एजन्सी, ६९३ बुधवार पेठ, पुणें.
—— :इतर सर्वत्र स्टॉकिस्ट पाहिजेत: ——

—दररोज वापरण्यासाठीं लागणारें—

लोणी आणि चक्का

खात्रीलायकपणें मिळण्याचें पुण्यांतील
—प्रमुख ठिकाण—
बेडेकर ब्रदर्स, पुणें, ८६७ सदाशिव पेठ, पुणें.


हें पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. नं. ९१५।१ आर्यभूषण छापखान्यांत रा. विठ्ठल हरि बर्वे, यांनीं छापिलें व रा. श्रीपाद वामन काळे, बी. ए., यांनीं 'दुर्गाधिवास, ८२३, शिवाजी नगर, (पो ऑ. डेक्कन जिमखाना) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.